# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. २८७/२०२४**

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) सभा शनिवार दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ व रविवार दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ (रविवार सुट्टीच्या दिवशी) आयोजित करण्यात आली असल्याने रविवार दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ या सुट्टीच्या दिवशी विद्यापीठ कार्यालय नेहमीच्या कार्यालयीन वेळेप्रमाणे सुरू राहील.

विद्यापीठ परिपत्रक क्र.२३६/२०२४ जा.क्र.एएन/३५७०, दिनांक २६.०९.२०२४ अन्वये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यालयाकरिता दिनांक २६.०९.२०२४ रोजी जाहिर केलेली सुट्टी भरून घेण्यासाठी शनिवार दिनांक ०७.१२.२०२४ रोजी (पहिला शनिवार सुट्टीचा दिवस) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यालय नेहमीप्रमाणे सुरू राहील असे परिपत्रक क्र.२६३/२०२४, जा.क्र.एएन/३९२८, दिनांक २६.१०.२०२४, अन्वये जाहिर करण्यात आलेले होते. त्याऐवजी रविवार दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ रोजी (रविवार सुट्टीचा दिवस) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यालय नेहमीप्रमाणे सुरू राहील व शनिवार दिनांक ०७.१२.२०२४ रोजी पहिला शनिवार असल्याने नेहमीप्रमाणे कार्यालय बंद राहील.

तसेच, रविवार दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ रोजीची पर्यायी सुट्टी विद्यापीठाचे अहमदनगर उपकेंद्र व नाशिक उपकेंद्रासाठी शनिवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२४ रोजी जाहिर करण्यात येत आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(प्रा.(डॉ.)ज्योती भाकरे)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 5066
दिनांक : 30 NOV 2024

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.